LEAP
LEPROSY ELIMINATION ACTION PROGRAMME

# चार चौघात सांगण्यास नको लाज।
# कुष्ठरोग हमखास बरा होतो आज।।

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम

## तपासून घ्या तीन गोष्टी...

1



तेलकट, गुळगुळीत, सुजलेली व लालसर त्वचा. कालांतराने जाड झालेल्या कानांच्या पाळ्या, विरळ झालेले भुवयांचे केस आणि अंगावरील गाठी.

2



हाता-पायांना सुन्नपणा/बधिरता, स्पर्शज्ञान नसणे. स्नायुंचा अशक्तपणा व विकृती.

3



शरीरावरील त्वचेपेक्षा फिक्कट किंवा लालसर रंगाचा, बऱ्याच दिवसांचा कुठलाही डाग/चट्टा.

## सर्वांनाच कळू द्या...

### कुष्ठरोग अनुवंशिक नाही.

- कुष्ठरोग हा कुष्ठजंतूमुळे (मायकोबॅक्टेरीअम लेप्रे) होणारा साधाच रोग आहे.
- कुष्ठरोगाविरुद्ध लढण्याच्या नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तीमुळे बहुतांश लोकांना (९८ टक्के) कुष्ठरोग होत नाही.
- कुष्ठरोग सर्व सांसर्गिक रोगांमध्ये सर्वांत कमी सांसर्गिक रोग आहे.
- बहुविध औषधोपचाराने (MDT) कुठलाच कुष्ठबाधित रोग पसरवित नाही.

**कुष्ठपीडित व्यक्तिच्या शारीरिक विकृती व विकलांगतेचा रोगप्रसाराशी कुठलाही संबंध नाही.**

## वरील लक्षणे दिसताच नागरी आरोग्य केंद्रात दाखवा.

# दिसताच लक्षणे करा विचार, टाळू नका औषधोपचार।

## बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.) मोफत मिळतो.

सहा ते बारा महिने औषधोपचार



मुलांसाठी

प्रौढांसाठी

औषधोपचारापूर्वी



औषधोपचारानंतर



- कुष्ठरोगाची शंका असल्यास आपली व आपल्या कुटुंबियांची तपासणी करून घ्या.
- लवकर निदान व नियमित औषधोपचाराने कुष्ठरोगातील शारीरिक विकृती व विद्रूपता निश्चितच टाळता येते.
- बहुविध औषधोपचाराखालील सांसर्गिक कुष्ठरोगी रोगप्रसार करू शकत नाही.

**सर्व सरकारी व निमसरकारी दवाखाने आणि नागरी आरोग्य केंद्रात कुष्ठरोगाचे मोफत निदान व औषधोपचार होतो.**

25/06/2025 (50,000)

## कुष्ठरोग कुठल्याही स्थितीत पूर्णपणे बरा होतो.

ALERT-INDIA

जनहितार्थ प्रकाशित : अॅलर्ट-इंडिया (कुष्ठरोग शिक्षण, उपचार आणि पुनर्वसन संस्था)
बी-९, मीरा मॅन्शन, सायन (प.), मुंबई - ४०० ०२२.

LEAP कुष्ठरोग दूरीकरण कृती कार्यक्रम